Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 6, July 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# लीळाचरित्र - एक परीक्षण

नीलिमा कुलकर्णी

सहजीवन कॉलनी शेल्हाळ रोड उदगीर

## प्रस्तावना :—

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी भाषेचा कैवार घेणारा व आपतारवाद मानुन भक्तीचे पण द्वैती तत्वज्ञान सांगणारा एक संप्रदाय उदयास आला तो म्हणजे 'महानुभाव' पंथ होय . महानुंभाव पंथ महाराष्ट्रात उदयास आला असला तरी त्याचा विस्तार काबुल कंदहारपर्यंत झालेला होता . आपल्या पंथाच्या प्रचार प्रसारासाठी महानुभावानी सहित्याची निर्मिती केली महानुभाव साहित्य विविधतेच्या व वैचिज्याच्या बाबतीत इतर कोणत्याही सहित्याला मागे टाकील असे आहे . या वाङ्मयात 'लीलाचरित्रासारखे चरित्रग्रंथ आहेत 'शिशुपालवध' सारखे अख्यानक काव्ये आहेत . 'पूजावसरा सारखी श्री . चकधरांचा दिनकम सांगणारा प्रकरणे आहेत महानुभाव साहित्य हे अतिशय समृध्द व मराठी भाषेचे सामर्थ्य सांगणारे सहित्य आहे .

म्हाईभट यांनी लिहिलेले 'लीळाचरित्र' हे मराठी भाषेतील पहिले चरित्र आहे . पहिला चरित्रग्रंथ महानुभवांनी लिहिला आहे . हा चरित्रग्रंथ विविध गुणांनी नटलेला आहे . अद्य चरित्रकार म्हाइंभटाला हा चरित्रग्रंथ का लिहावासा वाटला म्हणजे ग्रंथप्रेरणा कशी झाली ऋ याविषयी 'इतिहास' नावाच्या महानुभवीय प्रकरणात माहिती आली आहे . नागदेवाचार्यांना सतत चिंतर्नमनन करताना पाहुन म्हाईभटांनी त्यांना विचारले की "भेटोः तुम्ही निरंतर काइसयाचें मनन करीत असा ऋ" तेव्हा नागदेवाचार्यांनी सांगितले की श्रीचकधरांच्या लीलांचे चिंतन करतो ते एक प्रकारचे स्मरणच आहे' या त्यांच्या उत्तरावरून म्हाईभटाने म्हटले की 'तुम्ही भाग्यवान आहार्ततुमच्यावर स्वामींचा वरदहस्त होता त्यामुळे त्यांनी सांगितलेले शास्त्र व लीला तुम्हाला आठवतात पण आमच्या सारख्यांचे काय ऋ तेंव्हा तुम्ही सर्वज्ञांच्या लीला सांगा मी लिहून घेतो" अशा प्रकारे म्हाईभटांना लीलाचरित्र लिहिण्याची प्रेरणा झाली .

'लीलाचरित्र' हा ग्रंथ एकाक पूर्वार्ध व उत्तरार्ध याप्रमाणे तीन भागात विभागलेली आहे त्यापैकी एकाकात **74** लीला पूर्वार्धात **358** लीला उत्तरार्धात **488** लीला आहेत . या तीन्ही भागात मिळून चकधरांच्या आयुष्यातील आवतार स्वीकार शक्ति स्वीकार नागंबिकेला प्रेमदान नागदेवाचार्यांचे अनुसरण व शेवटी प्रयाण या पाच प्रमुख घटना आल्या आहेत . एकाकात चकधरांनी भडोच येथील प्रधानपुत्राच्या मृतशररात प्रवेश करूण अवतार धारण केल्यापासून त्यांच्या पैठण आगमनापर्यंतचा भाग आला आहे . एकान्तातून लोकान्तात आल्यानंतरचा भाग पूर्वार्ध व उत्तरार्धात विभागला गेला आहे . भक्तीभावाने लिहिलेल्या चरित्रातही किती पारदर्शकता असू शकते लीलाचरित्र याचा लीलाचरित्र एक वास्तुपाठच आहे . श्री . चकधर स्वामींचे जीवन कार्य अलौकिक आहे . त्यांचे चरित्र लिहिणारे म्हाईभट हे मेधावी पंडित होते . आणि चरित्राचे संपादन करणारे नागदेवाचार्य सत्यान्वेषी महात्मे होते . अशा संशोधका म्हाईंभटानी अथक प्रयत्नांनी चकधराच्या लीला एकत्र केला . प्रथमतः संपूर्ण महाराष्ट्रभर ते फिरले . जिथून कुठून सर्वज्ञानांच्या लीला मिळतील तिथे ते गेले . अनेक लोकांना प्रत्यक्ष भेटून चकधरांच्या जीवनाचे स्वभावाचे पैलू लोकांसमोर आणले सुमारे आठशे वर्षापूर्वी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'लीलाचरित्राचे' स्थान आग्रपूजेचे आहे .

### लीलाचरित्रिचे महत्व

### लीलासरित्रितून समाजदर्शन :-

लीलाचरित्रातील घटनातून तत्कालीन महाराष्ट्राच्या सणांची समारंभाची मनोरम वर्णने आली आहेत . त्यामुळे लीलाचरित्र हा त्या काळच्या समाजदर्शनाचा एक दस्ताऐवज झाला आहे तत्कालीन चालीरीती व्रतवैकल्ये वस्त्रेप्रावरणे खाणेपिणे नार्णीगाणी व्यापर उदीम इ . विविध अंगाचे दर्शन सहजतेने लीलाचरित्रातून होते . या ग्रंथातून

Please cite this Article as : नीलिमा कुलकणी , लीळाचरित्र - एक परीक्षण : Indian Streams research Journal (July; 2012)

तत्कालीन समाजाच्या स्थितिगतीची यथार्थ कल्पना येतेः यादकालीन महाराष्ट्रातीय समाज आणि संस्कृती अभ्यासाला 'लीलाचरित्र' चा विशेष उपयोग होते .

### लीलाचरित्रित चरित्र कोश :-

लीलाचरित्र केवळ श्रीचक्रधरांचेच चरित्र नव्हे तर त्यांच्या अनुषंगाने आलेली अनेक चरित्रे संस्मरणीय झाली आहेत . जसे समर्पित व्यक्तिमत्वाची बाईसा विरक्तीची परिसीमा गाठणारे नागदेवाचार्य अद्य कवियित्री महदंबा दैवत्वाचीमूर्ती गोविंदप्रभू नागदेवाचार्यांची आई आबाईसा मासोपवासींनी उमाईसा श्री . चक्रधरांच चरित्र फुलविणारी अनेक चरित्रे लीलाचरित्रात आली आहेत . या दृष्टीने लीलाचरित्र एक चरित्रकोशच आहे . यादवकालीन महाराष्ट्रातील भार्वभावनांचे प्रतिनिधित्व करर्णाया विविध चरित्रकारांच्या चरित्राचा बृहदकोशच असे लीलाचरित्राचे वर्णन केले तर हरकत नाही . लीलाचरित्रात उल्लेटित व्यक्तींची नावे जवळजवळ चारशे आहेत त्यात पुराणकाळातील व्यक्ति तसेच यादवपूर्वकालीन भारतीय व्यक्तींची नावे आहेत . यातुन चित्रित होणारा व्यापक भारतीय समाज व विशेषत्वाने महाराष्ट्रीय समाज आपल्या डोळयांसमोर येतो मुख्य चरित्र विषयाला पार्श्वभूमीप्रमाणे शाभून दिसणारी व्यक्तीचित्रे लीलाचरित्रात विविधतेने नटलेली असून त्यांचयद्वारे मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुनेच चरित्रकाराने उभे केले आहेत . लीलाचरित्र म्हणजे चक्रधर स्वामींच्या भक्तजनांची एक चित्रशाळाच आहे .

### लीलाचरित्रची भाषा :-

लीलाचरित्राची भाषा घरगुती असल्याने मराठी भाषेचे तत्कालीना लौकिक व व्यावहारिक रूप जे 'ज्ञानेश्वरी' सारख्या ग्रंात नाही ते पहावयास मिळते असे 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाड् . मय' या आपल्या ग्रंथात शं . गो . तुळपुळे यांनी म्हटले आहे . वाचण्यास गोड़ मनोरंजन असे व उद्‌बोधक असे लीलाचरित्राचे स्वरूप आहे . भाषेतील लहान लहान वाक्ये़ सुंदर वाक्प्रचार मार्मिक संवाद़ म्हणीवजा सुभाषित एकंदर शैलीचा साधेपणा व प्रसाद या गुणांमुळे चरित्र वाचनीय झाले आहे .

### लीलाचरित्रची बांधणी :-

चरित्रकार म्हाईभट हे एक चतुरस्त्र सक्षेपी़ कष्टाळू प्रामाणिक परंतु भावनिष्ठ व शैलिकार लेखक असल्यामुळे हे चिरत्र अधिकच सरस व रोचक झाले आहे . चरित्राची म्हणून जी काही बांधणी असते तशी मात्र बांधणी लीलाचरित्रात कुठेच दिसत नाहीत . त्यात साध्या लीला किंवा आठवणी अहोत . डॉ . वि . भी . कोलते यांनी लीला चरित्राला चक्रधर स्वामींची दैनंदिनी म्हटले आहे . पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे साध्या दैनंदिन आठवनीतुन म्हाईभटांनी वाचकांच्या मनः चक्षुपुढे एका अपूर्व व असामान्य अशा विभूतीचे चित्र जिवंत उभे केले आहे 'लीलाचरित्र' हा स्मरणभक्तीचा एक अतीव सुंदर असा अविष्कार असून मराठी वाड् . मयात त्याला तोड नाही .

### भौगोलिक चित्र :-

लीलाचरित्रातून ज्या प्रमाणे समाजाचे दर्शन घडते त्याचप्रमाणे भौगोलिक चित्राची दर्शन घडते भौगोलिक चित्राची संकल्पन येवू शकते . चक्रधरांचे भ्रमण़ मार्ग़ वातावरण़ राहणीमानाची ठिकाणे इ . लीलाचचरित्रातून रेखाटता येतात . श्री . पुरूषोत्तम नागुरे यानी स्थानपोथीच्या आधारे तयार केलेल्या ग्रंथात लीला दिलेल्या आहेत . यावरून तक्तालीन महाराष्ट्राच्या भौगोलिक गोष्टी कळण्यास मदत होते .

थोडक्यात महानुभाव पंथाच्या वाड् . मयाचा व तदंतर्गत तत्वज्ञानाचा मुळ ग्रंथ म्हणून लीलाचरित्राचे महत्व अनन्यसाधारण आहे . पुढील सर्व महानुभवीय वाड् . मयाचे बीज या ग्रंथा आहे . यातूनच पुढे सूत्रपाठ़ दृष्टन्तपाठ़ रत्नमालास्त्रोत इ . ग्रंथ निर्माण झाले .

### निष्कर्ष :-

**1** . भाषा साहित्य़ समाजदर्शऩ तत्वज्ञान अशा अनेक विषयांच्या दृष्टीने लीलचरित्र अष्टपैलू आहे .
**2** . घरगुती भाषेमुळे तत्कालीन मराठी भाषेचे व्यावहोरक रूप समजते .
**3** . भव्योदात्त विषयाला तितकाच जाणकार चोखंदळ व रसिक निवेदक लाभला आहे .

### संदर्भ :-


| | | |
|---|---|---|
| **1** . महानुभाव पंथ आणि त्यांचे वाड् . मय | :- | शं . गो . तुळपुळे |
| **2** . तत्रैव | :- | शं . गो . तुळपुळ |
| **3** . श्री . गोविंद प्रभुचरित्र प्रस्तावना | :- | डॉ . वि . भी . कोलते |
| **4** . महानुभाव साहित्य संशोधऩ खंड 1 | :- | यु . म . पठाण |